# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगाव

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त तथा नॅक प्रमाणित संस्था

राष्ट्रीय महामार्ग क्र.०६, जळगाव ४२५ ००२

दुरध्वनी क्र.०२५७-२२८१५२२ फॅक्स क्र.०२५७-२२८१३१९

Websit: www.gcoej.ac.in E-mail-princoej@rediffmail.com


जा.क्र.शाअमज/वि.वि./२०२०/1860 दिनांक:- 22 OCT 2020

**महत्वाची सुधारीत सुचना**

विषय:-शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील प्रवेश शुल्क भरण्याकरीता विद्यार्थ्यांना मुदतवाढ देण्याबाबत...

संदर्भ:-१ या कार्यालयाची सुचना जाक्रशाअमज/विवि/२०२०/१५६७ दिनांक-१६/०९/२०२०
२ या कार्यालयाची सुचना जाक्रशाअमज/विवि/२०२०/१५९३ दिनांक-२२/०९/२०२०
३ या कार्यालयाची सुचना जाक्रशाअमज/विवि/२०२०/१७३० दिनांक-०७/१०/२०२०
४ दिनांक १९/१०/२०२० रोजीचे विद्यार्थ्यांचे विनास्वाक्षरीचे महाविद्यालयास प्राप्त झालेले पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून महाविद्यालयातील सर्व वर्ष व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की,शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधे प्रवेशास पात्र असलेल्या व प्रवेश घेऊ ईच्छीणा-या विद्यार्थ्यांकरीता संदर्भ क्र.१ नुसार फि भरण्याबाबत सविस्तर सुचना लावण्यात आलेली होती तद्नंतर महाविद्यालयाच्या बऱ्याच विद्यार्थ्यांनी प्राचार्य/विभाग प्रमुख/वर्गशिक्षक तसेच कार्यालयातील संबंधीत यांना दुरध्वनी/व्हॉटस्अप/ई-मेल इ.द्वारे फि भरण्यास अडचण येत असल्याचे कळविले. त्यानुसार संदर्भ क्र.२ नुसार विद्यार्थ्यांसाठी फि भरण्याचे सुधारीत वेळापत्रक जाहीर करण्यात आले.

महाविद्यालयास वर नमुद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी तसेच काही विद्यार्थी संघटनांचे फि भरण्याचा कालावधी तसेच फि टप्प्या टप्प्याने भरण्याची सवलत मिळावी अशा प्रकारचे पत्र/सुचना प्राप्त झाल्या. त्यानुसार संदर्भ क्र.३ अन्वये सर्व वर्ष व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना लागू असलेले शुल्क दोन टप्प्यात भरण्याची सुचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

याबाबत कळविण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे व राज्यातील कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करता महाविद्यालयाचे नियमानुसार लागू असलेले शुल्क विद्यार्थ्यांच्या सोई नुसार भरण्याकरीता मुदतवाढ/टप्प्या-टप्प्याने भरण्याची सवलत देण्यात आली होती. तथापि, संदर्भ क्र.४ नुसार विद्यार्थ्यांनी केलेल्या विनंतीचा विचार करता फि भरण्याचे **अंतिम सुधारीत वेळापत्रक** खालील प्रमाणे राहील.

**अंतिम सुधारीत वेळापत्रक**

| अ.क्र | तपशिल | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| १ | फि भरण्याचा पहिला हप्ता (लागू असलेल्या शुल्कापैकी) | ०८/१०/२०२० ते ३१/१०/२०२० पर्यंत | सोबतच्या विवरण पत्राप्रमाणे |
| २ | फि भरण्याचा पहिला हप्ता दंडासह | ०१/११/२०२० ते १०/११/२०२० पर्यंत | प्रति दिवस २००/- |
| ३ | फि भरण्याचा दुसरा हप्ता (लागू असलेल्या शुल्कापैकी) | ०१/११/२०२० ते ३१/१२/२०२० पर्यंत | सोबतच्या विवरण पत्राप्रमाणे |
| ४ | फि भरण्याचा दुसरा हप्ता दंडासह | ०१/०१/२०२१ ते १५/०१/२०२१ पर्यंत | प्रति दिवस ५००/- |

तथापि, या सुचनेद्वारे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ताकीद देण्यात येते की, वर दिलेल्या सुधारीत वेळापत्रकाव्यतीरिक्त पहीला हप्ता भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही. तसेच यापुढे महाविद्यालयाच्या नावाने

1/2

( विनास्वाक्षरीचे ) कोणतेही निवेदन प्राप्त झाल्यास अशा निवेदनाचा विचार केला जाणार नाही. तसेच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे कार्यालय/विभागाचे कार्यालय अथवा वर्गशिक्षक यांना काही अडचणी असल्यास तसे कळवावे. परस्पर कोणीही संस्थेबाहेरील त्रयस्थ व्यक्तीस/संस्थेस अडचणी कळविण्यास सांगू नये. तसेच संस्थास्तरावर काही अडचणी उद्भवल्यास योग्य ती काळजी संस्थास्तरावर घेण्यात येईल त्यामुळे वरीष्ठ कार्यालय अथवा राजकीय पदाधिकाऱ्यांना परस्पर ई-मेल/पत्रव्यवहार घाई गडबडीने करू नये.

टिप:- उर्वरीत सुचना यापुर्वी निर्गमित केलेल्या सुचनांप्रमाणे कायम आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक २१/१०/२०२० व दि. २२/१०/२०२० रोजी दंडाची रक्कम भरून प्रवेश शुल्क भरलेले असेल अशा विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेचे संपुर्ण कामकाज पुर्ण झाल्या नंतर दंडाची रक्कम परत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ. जी.एम. माळवटकर)
प्र. प्राचार्य,
शासकीय अभि. महाविद्यालय,जळगाव

प्रत : १ मा.शैक्षणिक अधिष्ठाता, यांना माहिती व कार्यवाहीसाठी

२/-त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी विद्यार्थ्याने नियमानुसार लागू असलेले शुल्क भरल्याबाबतची खात्री होत नाही तो पर्यंत शै.वर्ष२०२०-२०२१ मधील प्रथम सत्राचा निकाल पुढील आदेशाशिवाय जाहीर करण्यात येऊ नये.

२ सर्व विभाग प्रमुख यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

२/-त्यांना कळविण्यात येते की,उपरोक्त सुचना निर्गमित झाल्याच्या दिनांकानंतर आपल्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी आपणास अथवा विभागातील वर्गशिक्षकांना काही मेल अथवा अर्ज सादर केल्यास अशा विद्यार्थ्यांची स्वतंत्रपणे आपल्या स्तरावर नोंद ठेवण्याबाबत संबंधीतांना सुचना द्याव्यात.

३ सर्व वर्ग प्रतिनिधी, सदर सुचना संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या व्हॉटस्ॲप गृप द्वारे द्यावी

२/- सर्व वर्गप्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना उपरोक्त सुचने प्रमाणे कार्यवाही करणेबाबत माहिती द्यावी जेणेकरून विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.

४ रोखपाल, यांना माहिती व कार्यवाहीसाठी

२/-त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी विद्यार्थ्यांनी फि भरल्याबाबतचा संगणकीय डाटा दिनांक १५/११/२०२० पर्यंत काढून त्याची स्वतंत्र नस्ती ठेवावी.